



**About Us:** http://www.galaxyimrj.com/about-us/
**Archive:** http://www.galaxyimrj.com/archive/
**Contact Us:** http://www.galaxyimrj.com/contact-us/
**Editorial Board:** http://www.galaxyimrj.com/editorial-board/
**Submission:** http://www.galaxyimrj.com/submission/
**FAQ:** http://www.galaxyimrj.com/faq/

# आदिवासी समाज आणि संस्कृती

**डॉ. आकाश ब. पवार**
(पोस्ट डॉक्टरेट),
मराठी भाषा व वाङ्मय विभाग,
डॉ. बा. आं. म. विद्यापीठ,
छ. संभाजीनगर

**प्रास्ताविक :**

भारत हा देश आठरापगड जाती-जमातींनी बनलेला आहे. भारतात आठरापगड जाती-जमातींबरोबर हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन, शिख, आदिवासी इत्यादी धर्मांचे लोकही वास्तव्यास आहेत. त्यामुळे भारतीय संस्कृतीने आपली ओळख जगभरात वेगळी निर्माण केलेली आहे. भारतीय समाजात वंश, भाषा, धर्म, जाती, रुढी, प्रथा, परंपरा, संस्कृती ही प्रत्येक जाती-जमाती व त्यांच्या पोटजमातींच्या वेगवेगळ्या आहेत. या जाती- जमातींच्या आचार विचारांमध्ये भिन्नत्व जाणवते. याच आधारावर भारतामध्ये सामाजिक स्तर निर्माण करताना त्याचे तीन भागामध्ये वर्गीकरण केलेले आहे. नागरी समाज, ग्रामीण समाज आणि आदिवासी समाज असे आहेत.

भारतीय आदिवासी जमातीत अनेक वेगवेगळ्या आदिवासी जमातींचा व त्यांच्या पोटजमातींचा समावेश होतो. या आदिवासी जमातीला इंग्रजीमध्ये 'TRIBES' या नावाने ओळखले जाते. तर हिंदी मध्ये 'जनजाती' असा उल्लेख आढळतो. मराठीमध्ये त्यांना 'आदिम जमाती' म्हणून ओळख प्राप्त झालेली आहे. आदिवासी जमातींची पार्श्वभूमी पाहताना काही प्राथमिक बाबींची नोंद घेणे आवश्यक आहे. हजारो वर्षापासून या भूमीचे मूळ मालक म्हणून आदिवासींचा उल्लेख केला जातो. या जमिनीवर त्यांचा मालकी हक्क आहे. त्यामध्ये गोंड, भिल्ल, कातोडी, महादेव कोळी, वारली, कोलम, आंध, परधान, आंध, कातकरी या सारख्या विविध जमातींचा त्यात समावेश करता येईल. या आदिवासींची प्रगत आणि आगळी वेगळी संस्कृती होती. आर्यांनी आदिवासी जमातींना संस्कृतीहीन लेखले असले तरीही आर्य भारतात येण्यापूर्वी भारतात आदिवासींचे राज्य सुसंस्कृत आणि संपन्न होते. या संदर्भात गोकूळदास मेश्राम लिहितात, "हडप्पा व मोहेंजोदडो येथील उत्खननात प्राचीन नगरांचे अवशेष सापडले आहेत. तशाच प्रकारचे अवशेष इतरत्रही सापडले आहेत. या सर्व ठिकाणी सापडलेल्या अवशेषांच्या समान

वैशिष्ट्यांवरुन या संस्कृतीस 'हरप्पा संस्कृती' म्हटले आहे. या संस्कृतीचे केंद्रस्थान नगरे होती. म्हणून या संस्कृतीस 'नागर संस्कृती' असेही म्हणतात. ही संस्कृती जगातील अतिप्राचीन संस्कृतीपैकी एक आहे. व ही आदिमानवाची मूळ संस्कृती आहे म्हणून हिला 'मूळ निवासी यांची संस्कृती' असे म्हटल्यास काही वावगे होणार नाही."[१] या वरील संदर्भावरून आदिवासींची संस्कृतीची पार्श्वभूमी लक्षात येते. गोकूळदास मेश्राम यांनी आदिवासींची संस्कृती ही भारतातली सर्वात पुरातन संस्कृती न मानता संपूर्ण जगातील आदिवासींची संस्कृतीचा उल्लेख केलेला आहे. आदिवासींच्या या संस्कृतीतून त्यांची मातृभाषा, बोलीभाषा, धर्म, रूढी, प्रथा, परंपरा, त्यांच्यातील एकरूपता, बंधुभाव, दया, करूना, कल्पना, शेती, समाजरक्षण व जातपंचायत, न्यानिवाडा या सारख्या अनेक समाज जीवन पद्धतीत 'सुजलाम सुफलाम शश्यशामलाम'पणे आदिवासी लोक गुण्या गोविंदाने येथे नांदत होते. असे जीवन जगत असताना पश्चीम वायव्य व ईशान्य दिशाकडून द्रविड, आर्य, मंगोलियम या लोकांनी भारतात प्रवेश केला. मूळ संस्कृतीप्रीय जगणाऱ्या आदिवासी जमातीवर हल्ले केले. जाळपोळ केली, नीती, भाषा, भू-प्रदेश यावर त्यांनी ताबा मिळविण्यास सुरुवात केली. यातूनच आर्य आणि अनार्य संघर्ष पेटवत राहिला. या संघर्षात आदिवासींनी पळ काढून जंगल, नद्या, खोरे, दऱ्या, डोंगर, कपारी येथे वास्तव्य करू लागले. तिथेच त्यांनी आपले निवासस्थाने वसलेली आहेत. त्यामुळे नागरी समाजापासून, ग्रामीण समाजापासून हा आदिवासी समाज कोसोमैल दूर वास्तव्यास आहे. यामुळे तो विकासापासून वंचित आणि उपेक्षित राहिलेला आढळतो.

**आदिवासी कोणाला म्हणावे :**

आदिवासी म्हणजे कोण व आदिवासी कोणाला म्हणावे या संदर्भात विविध संशोधकांनी अभ्यासकांनी आदिवासींच्या व्याख्या केलेल्या आहेत. या व्याख्यावरून ते स्पष्ट करता येईल.

१. **गिलीन आणि गिलीन :** "एखाद्या विशिष्ट भूप्रदेशावर राहणारा, समान बोलीभाषा बोलनारा व समान सांस्कृतिक जीवन जगणारा पण अक्षर ओळख नसलेल्या स्थानिक गटांच्या समूदयाला आदिवासी म्हणतात."[२]
२. **डब्ल्यू. जे. पेरी :** "एकसमान भू-प्रदेशावर राहणाऱ्या व एकसमान बोलीभाषा बोलणाऱ्या जनसमूहाला आदिवासी म्हणून ओळखले जाते."[३]

या वरील व्याख्या पाश्चात्य अभ्यासकांनी केलेल्या आहेत. त्या बरोबरच काही भारतीय संशोधक, अभ्यासकांनीही आदिवासींच्या व्याख्या केलेल्या आहेत.

१. **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी :** "नागर संस्कृतीपासून दूर व अलिप्त राहिलेले संबंधित प्रदेशातील मूळचे रहिवासी म्हणजे आदिवासी होय."[४]
२. **पंडित महादेवशास्त्री जोशी :** "आर्य व द्रविड हे भारतातील दोन मोठे मानव समाज सोडून त्यांच्याही पूर्वी भारतात राहणाऱ्या किंवा बाहेरच्या देशातून येऊन वने व पर्वत यांच्या आश्रयाने स्थानिक झालेल्या जमातींना वन्य जाती किंवा आदिवासी असे म्हणतात."[५]
३. **गोविंद गारे :** "भौगोलिकदृष्टया इतरांपासून नेहमीच दूर म्हणजे गिरीकंदराज राहिल्यामुळे जंगलात राहणारा निसर्गाचा सानिध्यात वाढलेला म्हणजे आदिवासी"[६] होय.
४. **प्रा. वामन शेळमाके :** "आदिवासी म्हणजे भूतलावर पहिले पाऊल ठेवणारा माणूस, नागरी संस्कृतीपासून अगदीदूर जंगल खोऱ्यात दूर्गंम दऱ्याखोऱ्यात राहणारा व स्वत:चे अस्तित्व जपणारा माणूस म्हणजे आदिवासी होय"[७]
५. **माधव बंडू मोरे :** "पशुपाल जगात, पशुपूजक जगात पहाडी जंगली जगात, प्राचीन जगात राहणारे गिरीजन वनवासी म्हणजे आदिवासी होय."[८]

आदिवासीबद्दल असा उल्लेख वरील व्याख्यांच्या माध्यमातून झालेला आहे. याव्याख्या वरून आदिवासी जमातींच्या संस्कृतीचे बलस्थाने मांडलेले आहेत.

**आदिवासी समाजाचे स्वरूप :**

महाराष्ट्रामध्ये आदिवासींच्या जमातींची संख्या ४७ होती. परंतु सद्य:स्थितीमध्ये महाराष्ट्र राज्य सरकारने सुधारित यादी तयार करताना एकूण ४५ जमातींचा त्यात समावेश केलेला आहे. आदिवासी जमातींच्या अनेक पोटजमाती आहेत. या आदिवासी जमाती आजही सातपुड्यांच्या डोंगररांगामध्ये वसलेल्या आहेत. महाराष्ट्रामध्ये आदिवासी जमाती तीन विभागात विगालेल्या आढळतात.

१. **सह्याद्री विभाग :**

हा विभाग नाशिक या नावाने ओळखला जातो. यामध्ये नाशिक, रत्नागिरी, रायगड, ठाणे, अहमदनगर, पुणे इत्यादी जिल्ह्यांचा समावेश होतो. या विभागात

मल्हारकोळी, ढोर कोळी, सोन कोळी, टोकरेकोळी, वारली, ठाकर, कोकणा, कातकरी इत्यादी जमातींची वस्ती आहे.

२. **सातपूडा विभाग :**

या विभागात धुळे, नंदूरबार, जळगाव, अमरावती, नांदेड हे जिल्हे आहेत. या विभागात आंध, कोकणा, गावित, पावरा, तडवी, कोलम, कोरकू इत्यादी जमाती आढळतात.

३. **गोंडवन विभाग :**

या विभागात विदर्भातील चंद्रपूर, यवतमाळ, गडचिरोली, भंडारा, नागपूर इत्यादी जिल्ह्यांचा त्यात समावेश होतो. या विभागात कोरकू, गोंड, कोलम, परधान, राजगोंड, माडिया गोंड, आंध इत्यादी जमातींचे वास्तव्य आढळते."[९] सुदाम जाधव यांनी असे वर्गीकरण केलेले असले तरीही आज जवळपास आदिवासी जमातींचे वास्तव्य संपूर्ण महाराष्ट्र भर व्यापलेले आहे.

आदिवासी जमाती ज्या ठिकाणी आपले वास्तव्य करीत आहेत तेथील भौतिक आणि सांस्कृतिक जीवन वेगळे आहे. जमात निहाय समूहाने राहणारे आदिवासींची मूल्ये नैतिकता, वैशिष्ट्ये यांच्यात सारखेपणा आढळून येतो. या जमातींचा सहसंबंध निसर्गाशी असल्यामुळे आकाश, जंगल, जमीन, डोंगर, नद्या, दऱ्या, ओढे, पशुपक्षी या सर्वांचा आदिवासींना आधार वाटतो आहे. आदिवासी जमातीमध्ये संचित करण्याला निशिद्ध मानलेले आहे. त्यामुळे खाण्यासाठी कंदमुळे, फळे, शिकार करणे त्यावर आपले उदरनिर्वाह भागवणे अशा पद्धतीचे पूर्वकालीन जीवन जगत होते. त्यामुळे आदिवसी जमातीमध्ये काटकसरपणा, सहनशीलता, चपळपणा, स्वछंदीवृत्ती सहजता आणि अब्रू झाकण्यापुरते वस्त्र यावर आजही काही आदिवासी जमाती आनंदी आहेत.

महाराष्ट्रातील आदिवासी हे शेती करतात. ज्यांना शेती नाही असे लोक मासेमारी, शिकार, जंगल कामगार, मध गोळा करणे किंवा डिंक गोळा करणे, अशा स्वरूपाचे व्यावसाय करून आपला दैनंदिन उदरनिर्वाह करतात. 'कातकरी' जमात ही कोळसा पाडण्याचे काम करते. त्याच बरोबर आदिवासींच्या राहत्या जागेला 'पाडा' असे म्हणून ओळख मिळालेली आहे. आदिवासींच्या या झोपड्या बांबू पासून व कुडाच्या बनलेल्या असतात. त्यांचे वस्त्रेही अर्धवटच राहतात. उदा. भिल्ल जमातीचे लोक कंबरेला लंगोटी

वापरतात. तर स्त्री ही लुगड्याचे दोन तुकडे करून वापरत असते. सद्य:स्थितीत प्रत्येक आदिवासी जमातींच्या पेहरावात काळानुरूप बदल झालेले पाहवयास मिळतात.

**आदिवासी जमातींचे विशेष :**

१. आदिवासी लोकांचे वास्तव्य हे नगरी, सुधारलेल्या जगापासून कोसोमैल दूर आहे.
२. आदिवासी लोक दैनंदिन जीवनात उदरनिर्वाहासाठी भटकत राहतात. त्यामुळे स्थैर्य प्राप्त झालेले नाही.
३. आदिवासी जमातीला त्या त्या जमातीची एक स्वतंत्र बोलीभाषा असल्याचे आढळते.
४. आदिवासी जमातीमध्ये अंधश्रद्धा, जादूटोना, मांत्रिक, देवदेवतांवर अधिक विश्वास असल्याचे आढळते.
५. शिकार करणे हे आदिवासींच्या जीवनातील महत्त्वाचा घटक मानलेला आहे.
६. आदिवासींना निसर्गाचे वरदान मिळालेले आहे. हा निसर्ग त्यांना रोजगार, उदरनिर्वाह करण्यासाठी साधने उपलब्ध करून देतो आहे.
७. आदिवासी आपले धार्मिक सणउत्सव साजरे करताना नृत्यगीतांचा सामूहिक कार्यक्रमात सहभागी होतात.
८. मद्यपान करणे हा आदिवासींच्या जीवनाचा अविभाज्य घटक मानला जातो.
९. आदिवासींमध्ये स्वतंत्ररित्या न्यायनिवाड्यासाठी जात पंचायती आहेत.
१०. न्यायालयापेक्षाही जातपंचायतीने दिलेले निर्णय महत्त्वाचे आहेत. या निर्णयाचे पालन करणे ते अद्य कर्तव्य समजातात.

**संस्कृती म्हणजे काय :**

संस्कृती या शब्दाची उत्पत्ती ही इंग्रजी मधून झालेली आहे. 'संस्कृती' या शब्दाला इंग्रजी या शब्दकोशात 'कल्चर' असा प्रतिशब्द आहे. 'संस्कृती' आणि 'संस्कार' हे दोन्ही शब्द एकाच धातूपासून बनलेले आहेत. या दोन्हीचा अर्थ 'संस्कार' या धर्मक्षेत्रापुरता मर्यादित आहे. परंतु संस्कृती हा शब्द अंतर्बाह्य जीवनाचा अभ्यास करण्यासाठी वापरला जातो. मानवाच्या भोवताली भौतिक आणि अभौतिक संस्कृती असते. या भौतिक संस्कृतीबद्दल प्रल्हाद लुलेकर म्हणतात, "मानवी समाजाच्या अस्तित्वासाठी त्याने निर्मिलेल्या वस्तूंच्या आधारे त्याच्या जीवनाचे तो समायोजन करीत असतो. हे समायोजन समाजाच्या सर्वांसाठीच असते. या समायोजनासाठी मानवाने निर्मिलेल्या आणि लौकिक जीवनात वापरात असलेल्या सर्वच वस्तू भौतिक संस्कृतीत समाविष्ट होतात. त्यावरून त्यास भौतिक संस्कृती (Material Culture|) असे

म्हटले जाते."[१०] तर पुढे ते अभौतिक संस्कृतीबद्दलही आपले मत व्यक्त करताना म्हणतात की. "मानवी जीवनावर अमूर्त स्वरूपात नियंत्रण ठेवणाऱ्या अनेक बाबी आहेत. या सर्व बाबींनी मानवी जीवन सुसंस्कृत बनते असे आपण म्हणतो तेव्हा त्या बाबींचा संकीर्ण समग्रता आपणास अभिप्रेत असते. अशा अमूर्त बाबी अभौतिक संस्कृती (Non-Material Culture) असे समाविष्ट होतात."[११] माणसाच्या अवती भोवतीचे असणारे विश्व मिळून भौतिक आणि अभौतिक स्वरुपाचे चित्रण संस्कृतीमध्ये आलेले असते.

**संस्कृतीच्या व्याख्या :**

संस्कृती म्हणजे काय हे समजून घेताना काही भारतीय अभ्यासकांनी आणि संशोधकांनी संस्कृतीच्या व्याख्या केलेल्या आहेत.

१. **कोटबागी उषा :** "संस्कारपूर्ण संस्कारमय जीवन जगण्याची देशकाळ विशिष्ट रीत म्हणजे संस्कृती"[१२] होय.
२. **देशपांडे प्रकाश :** "संस्कृती म्हणजे एक विशिष्ट समाजाचा ठेवा असलेल्या अंतिम मूल्यांची जाण जी त्याच्या सामूहिक संख्यामधून व्यक्त होते. जी त्यातील व्यक्तीचा स्वभाव, भावना, दृष्टिकोण व वागणूक तसेच भौतिक वस्तूना जे रूप देतात त्यातून व्यक्त होते."[१३]
३. **भगत दत्ता :** मुनष्य व्यक्तिशः व समुदायशः जी जीवनपद्धती निर्माण करतो आणि जीवन साकल्याचे स्वत:वर व बाह्य विश्वावर संस्कार करून अविष्कार करतो ती पद्धती व तो अविष्कार म्हणजे संस्कृती" [१४] होय.

या वरील व्याख्यांवरून असे आढळते की मानवी जीवनाच्या कल्याणासाठी आणि त्याच्या सर्वांगीन अंतरबाह्य जीवनाला समृद्ध करण्यासाठी ही संस्कृतीचे बंधने त्यावर लादलेली असतात.

**आदिवासी जमातींची संस्कृती :**

आज मानव समूह आपल्या वेगवेगळ्या संस्कृतीने संपन्न झालेला आहे. तसाच आदिवासी समूह ही त्याची संस्कृती टिकवून ठेवण्यासाठी धडपडत आहे. ही संस्कृती पिढ्यानंपिढ्या चालत आलेली आहे. त्यामध्ये थोड्याफार प्रमाणात बदलही झालेले आहेत. आदिवासींच्या संस्कृतीमध्ये त्यांचे निवासस्थान, सामाजिक जीवन यावर अनेक संशोधकांनी व अभ्यासकांनी संशोधन केलेले आहे. यातून आदिवासी संस्कृती ही

'आदर्श संस्कृती' आहे असे मान्य केले. आदिवासी संस्कृतीमध्ये एकमेकांना सहकार्याची भावना, एकत्र कुटुंबपद्धती व कुलचिन्ह याता अत्यंत महत्त्वाचे स्थान दिलेले आहे. निसर्गशक्तींना पूज्य मानने. निसर्गाची जपवणूक करून त्याचे संवर्धन करणे, आपल्या कुलदैवतांवर श्रद्धा ठेवणे असे आदिवासींच्या दैनंदिन जीवनात आढळून येते.

१. **हस्तकला :**

आदिवासी जमातींना दगड, माती, लाकूड यांचा वापर करून आपल्या नृत्य कलेसाठी लाकडापासून व भापळ्यापासून ढोल, खुळखुळे, डमरू, पावे इत्यादी वाद्य बनवलेले आहेत. आदिवासींमध्ये मृत्यू पावलेल्या व्यक्तीची आठवण म्हणून दगड रोवण्यासाठी प्रथा, त्या दगडावर कोरीव काम करणे. मोर, बंदुक, प्राण्याचे तोंड इत्यादीचे चित्र काढणे. चटया बनवणे, टोपल्या तयार करणे, तरुण तरुणींचे नटण्याचे व शृंगाराचे साधन बनवणे व त्यांचा वापर करणे हे वैशिष्ट्यपूर्णच आहे.

२. **दैवते :**

आदिवासींना कोणताही धर्म नाही. ते मोहाच्या झाडाला देव मानतात. कारण त्यापासून दारू मिळते. औषधी तयार होतात. निसर्ग हा त्यांचा खरा देव आहे. त्यासोबतच हिरवादेव, बडादेव, सूर्यदेव, वाघदेव, सर्पदेव, डोंगरदेव असे ते देवाला भजतात.

३. **घरबांधणी :**

आदिवासी लोक घर बांधणीसाठी सागाच्या लागडाचा वापर करतात. कारण साग हा जास्त टिकावू असते. घराच्या भिंती काखी बांबूच्या पाट्या ठोकून माती व शेणाने सारवलेल्या असते. घराचे छप्पर पळसाच्या पानाने, गवताने अथवा मोहाच्या पानाने साकारलेले असते. आदिवासींच्या झोपड्यांना दरवाजे नसतात. असले तरी त्यांना कडी कोंडा नसतो. घरावर प्रत्येकांनी आपल्या जमातीची ओळख म्हणून चित्र किंवा चिन्ह भिंतीवर कोरलेले असते.

४. **मुखवटे :**

वारली, भिल्ल, ठाकर, कोकणा या जमातीमध्ये मुखवट्याला फार महत्त्व दिलेले आहे. या मुखवट्यांचा वापर वारल्यांमध्ये बोहल्याच्या वेळी, भिल्लांमध्ये होळीच्या वेळी

तर कोलाम जमातीमध्ये दंडार नृत्य सादर करताना याचा वापर केला जातो. या मुखवट्याचे स्वरुप मागच्या बाजूने पोकळ असून त्याला समोरच्या बाजूने नक्षीकाम केलेले असते.

५. **वाद्ये :**

आदिवासी जमातीमध्ये वाद्याला खूप महत्त्व दिलेले आहे. हे वाद्य नृत्य करण्यासाठी, सण, उत्सवामध्ये वाजविण्यासाठी जन्म, मृत्यूच्या वेळी वाजवण्यासाठी वापरले जाते. हे वाद्य माडिया, गोंड, परधान, भिल्ल या जमातीमध्ये ढोल, ताशा, नगारे, डुंगरी, ढोलकी, तारपी इत्यादी वाद्य ते वापरतात. ठाकर जमातीमध्ये तारपा, ताडाचे पान, भोपळा व बांबूपासून तयार केलेल्या आदिवासींवाद्याला सांस्कृतिक कार्यक्रमात अधिक महत्त्व असते.

६. **सण उत्सव :**

आदिवासींमध्ये सण उत्सव सादरीकरण्याच्या पद्धती वेगळ्या आहेत. सण उत्सवाच्या गीतांमध्ये शिमग्याची गीते, गौराआईचे गीते, दिवाळीचे गीते, लग्नाची गाणी यांचा समावेश होतो. त्याच बरोबर दिवाळी, वाघबारस, नव्याचीपुनव, भूवाइ्र, रांडभावे, वरुणदेव, हेरली, होळी असे सण ते साजरे करतात.

७. **अंधश्रद्धा :**

आदिवासी जमातीमध्ये अंधश्रद्धेचे प्रमाण अधिक आहे. जादूमंतर, जादूटोना, भूतबाधा, यावर मोठा विश्वास त्यांच्यात दिसून येतो.

८. **अलंकार :**

यामध्ये कापडाच्या वस्तू, शाली, घोंगड्या, टोपल्या अशा वस्तू आदिवासी बनवतात. पादत्राणे, मातीचे दिवे, दंडामध्ये कंगण, डोक्यात कंगवे, काचबांगड्या, गळ्यातील हार, कर्णफुले, बिंदी, मुकरा, गळ्यात चांदीच्या सरी, कंबरेला पट्टा, पायात तोरड्या किंवा जोडवे परिधान करतात.

९. **गोंदन :**

आदिवासींमध्ये गोंदण्याची प्रथा केव्हापासून चालू झाली असावी हे निश्चितपणे सांगता येणार नाही. परंतु "शरीरावर चित्राकृती किंवा चिन्ह उमटविण्याकरीता टोचून घेण्याची क्रिया गोंदण्याप्रमाणे जखमा करून व्रण उठविण्याचाही एक प्रकार आहे. तथापि कापडाचा वापर सुरू होण्यापूर्वी सौंदर्य दृष्टिने शरीर रंगविण्यासाठी प्रथा असावी अथवा व ती नकळत रंगद्रव्य मिसळून तो व्रण कायम झाला असावा"[१५] यातूनही आदिवासींमध्ये गोंदण्याची प्रथा चालू झाली असावी असा अंदाज येतो.

याच बरोबर आदिवासींच्या प्रत्येक जमातीमध्ये जन्मविधी, लग्नविधी आणि मृत्यूविधीची परंपरा वेगळी आहे. अधिक प्रमाणात मृत्यू विधीत दु:खवटा पाळण्यासंदर्भात काही वेगवेगळे नियम असल्याचे आढळून येते.

**समारोप व निष्कर्ष :**

प्रस्तुत शोधनिबंधातून आदिवासी समाज आणि संस्कृतीचा विचार केलेला आहे. यामध्ये आदिवांच्या विविध व्याख्या, आदिवासींचे स्वरूप, आदिवासी कोणाला म्हणावे, आदिवासींचे विशेष काय आहेत याची मांडणी केलेली आहे. त्या सोबतच संस्कृती म्हणजे काय. संस्कृतीच्या व्याख्या आणि आदिवासींची संस्कृती कशी वेगळी आहे याची मांडणी करून दाखवलेली आहे.

**निष्कर्ष :**

१. आदिवासी समाजात अनेक जमातींचा समावेश करण्यात आलेला आहे.
२. प्रत्येक आदिवासी जमात ही सांस्कृतिक दृष्ट्या भिन्नत्वाने आलेली आहे.
३. आजही आदिवासी जमातीमध्ये संचित करण्याची परंपरा आढळून येत नाही.
४. आदिवासी जमाती डोंगर, दऱ्या, कपारीत, जगल यात न राहता आता ती शहरीकाणाच्या सानिध्यात वास्तव्याला आलेली आहे.
५. आदिवासी मध्ये येणाऱ्या प्रत्येक जमातीला आपली स्वतंत्र बोलीभाषा आहे.

**संदर्भसूची :**

१. मेश्राम गोकोळूदास – आदिवासी संधु संस्कृती आणि तिचे वारसदार व त्यांचा धम्म, सुगावा प्रकाशन, पुणे. द्वि. आ. मार्च २०१२ पृ. क्र. २६, २७
२. तुमराव विनायक – आदिवासी साहित्य : स्वरुप आणि समीक्षा, विजय प्रकाशन, नागपूर प्र. आ. १९९४ पृ. क्र. ५

३. उनि, पृ. क्र. ७
४. जोशी लक्ष्मणशास्त्री – मराठी विश्वकोश, खंड पहिला, म.सा.स. मंडळ, मुंबई, प्र. आ. १९७६ पृ. क्र. २८
५. जोशी महादेवशास्त्री पंडित – भारतीय संस्कृतीकोश, खंड एक, संस्कृतीकोश मंडळ, पुणे. प्र. आ. १९६२, पृ. क्र. ४२६
६. गारे गोविंद – भारतीय आदिवासी समाज आणि संस्कृती, अमृत प्रकाशन, औरंगाबाद. प्र. आ. १९९३ पृ. क्र. ८७
७. भोईर भगवान (संपा) – उद्धव पाखरे, स्वप्नील प्रकाशन, भिवंडी, प्र. आ. १९९८ पृ. क्र. १२७
८. मोरे माधव – आदिवासी बोलू लागला, सुगावा प्रकाशन, पुणे. पृ. क्र. १
९. जाधव सुदाम – आदिवासी साहित्य, सुलभा प्रकाशन, औरंगाबद. पृ. क्र. ३७
१०. कोटबागी उषा – इरावती कर्वे : व्यक्ती आणि वाङ्मय, पद्मगंधा प्रकाशन, पुणे. प्रथम आवृत्ती २००५ पृ. क्र. १९४
११. देशपांडे प्रकाश – भारताची राष्ट्रीय संस्कृती, एम. अबाद हुसेन, अनुवाद नॅश्नल बुक ट्रस्ट इंडिया, नवी दिल्ली, आवृत्ती १९९२ पृ. क्र. ३
१२. भगत दत्ता – आधुनिक मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद पृ. क्र. ५
१३. लुलेकर प्रल्हाद, तुपे केशव – साहित्याचे सांस्कृतिक संचित, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, आ. नोव्हेंबर २००५ पृ. क्र. १७
१४. उनि, पृ. क्र. १८
१५. जोशी लक्ष्मणशास्त्री – मराठी विश्वकोश, खंड पाचवा, म.सा.स. मंडळ, मुंबई, प्र. आ. १९७६ पृ. क्र. २२२